दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ९ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३२८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये



गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
मो.न.9422660077


# केजकरांनी सिंघम खासदार बजरंग सोनवणेंचे केले उत्साहात स्वागत

## अफाट गर्दीत.. उदंड उत्साहात, केजकरांनी माझे भारावून टाकणारे स्वागत केले-खा. बजरंग सोनवणे

**वादळवार्ता/विशेष**
वाढदिवसाचे निमित्त, लोकसभेचा विजय आणि माझ्या हृदयातल्या माणसांनी केज शहरात आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात माझा अविस्मरणीय सन्मान केला. त्यापूर्वी झालेले भव्य स्वागत कधीही विसरू शकणार नाही. हा पारिवारिक सोहळा होता. माणसे मोठ्या उत्साहात आपापली कामे टाकून माझ्यासाठी, माझ्या प्रेमापोटी आली. त्यांचा सत्कार स्वीकारून आभार मानत सर्वांशी संवाद साधला. "तुमच्यातला आपला माणूस



म्हणून मी देशाच्या संसदेत पोहोचलो. विनम्रपणे तुमचा हा सत्कार स्वीकारतो. आपणा सर्वांना वंदन करतो. तुम्ही दिलेली शक्ती आता देशाच्या संसदेत गर्जत आहे. तुमचा आवाज तिथपर्यंत पोहोचवण्याचं काम तुम्हीच केलं आहे. तुमच्यासाठी जिंकलो, आता तुमच्यासाठीच लढायचं आहे. तुमच्या प्रश्नांचा, अडचणींचा एल्गार लोकसभेत करतोय. तुमचा हा आशीर्वाद मला ताकद देतोय. लोक आपल्याला निवडून देतात मग लोकांसाठी काम करायचं. आमचे नेते आदरणीय जयंत पाटील साहेब, भगिनी आदरणीय सुप्रियाताई मला मोठा सन्मान देतात. देशाच्या आदरणीय राहुल गांधी, अखिलेश यादव साहेबांच्या बाजूला उभा राहून बजरंगबप्पा तुमचे प्रश्न देशाच्या संसदेत मांडतोय. हे केवळ तुमच्या आणि तुमच्याच प्रेमामुळे घडलं. सर्व समाजाच्या मतांवर मी निवडून आलो. तुमचे हे पांग फेडल्याशिवाय



राहणार नाही. माझ्या जिल्ह्याचा विकास माझ्यासाठी सर्वोपरी आहे. त्याबाबतीत कुठलीही तडजोड मी होऊ देणार नाही. आता आम्ही जिल्ह्याच्या विकासाचा विचार करू. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवू. जनताच आपल्याला मोठं करत असते. जनतेने आपल्याला आजवर मोठे केले आहे. आता मला संधी दिली. त्या पटीचे कार्य मला करून दाखवावे लागेल. सर्व सरकारी विभागांच्यावर माझी बारीक नजर आहे. अर्ध्या रात्री काम पडले तरी बजरंग बप्पा तुमच्यासाठी उपलब्ध असेल, हा विश्वास देतो." अशा भावना यावेळी बोलताना व्यक्त केल्या.

# नाशिक एक्साईज भरारी पथकाच्या वाहनाला कट मारून उडविले, एकाचा मृत्यू.

**नाशिक/सुरेश इंगळे.** अवैध मद्य वाहतूक करणाऱ्या वाहनाचा पाठलाग करतांना सदर वाहनाने एक्साईजच्या नाशिक भरारी पथकाच्या वाहनाला कट मारला, त्यामुळे पथकाची सरकारी स्कार्पियो जीप शेतामध्ये जाऊन उलटली. यामध्ये जीप चालक कैलास गेनू कसबे वय (५०)यांचा मृत्यू झाला असून पोलीस जवान राहुल पवार व अजून दोन जवान गंभीर जखमी झाले आहेत. अवैध मद्य वाहतूक करणाऱ्या वाहनाची गुप्त माहिती राज्य उत्पादन शुल्क नाशिक विभागाच्या भरारी पथकाला मिळाली असता, मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अवैध मद्य वाहतूक




करणाऱ्या वाहनाला रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क नाशिक यांच्या भरारी पथकाने सापळा रचला होता, अवैध मद्य वाहतूक करणाऱ्या वाहनाचा घोटीपासून नाशिक व नाशिक पासून मनमाड पर्यंत सुमारे दीडशे किलोमीटर अंतरापर्यंत भरारी पथकाची दोन वाहने या वाहनाच्या मार्गावर होती. हरनुल टोल नाक्याजवळ वाहन चालकाने सरकारी वाहनाला कट मारून उडविले.ही घटना नाशिक जिल्ह्यातील चांदवड मनमाड रस्त्यावर जुना हरनुल टोलनाक्याजवळ सोमवारी (दि.८) पहाटेच्या सुमाराला घडल्याचे सूत्रांनी सांगितले .या घटनेमध्ये स्कार्पियोचे चालक कसबे यांचे नियंत्रण सुटले आणि कार थेट महामार्गावरून एका शेतात जाऊन पलटी झाली. तसेच दुसऱ्या एका खाजगी वाहनालाही अवैध मद्य वाहतूक करणाऱ्या वाहनाने कट मारून पळून गेले. सुदैवाने दुसरे वाहन पलटी झाले नाही .जखमी जवानांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अवैध मद्य वाहतूक करणारे वाहन घेऊन, गुन्हेगार घटनास्थळावरून फरार झाले. नाशिक ग्रामीण पोलीस व एक्साईज विभागाचे दुसरे पथक त्या वाहनाचा शोध घेत असून गुजरात, मध्य प्रदेश सीमावर्ती नाक्यावर पोलिसांनी अलर्ट जारी केला आहे. लवकरच गुन्हेगारांना ताब्यात घेऊ असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# भरधाव कारची धडक; पती-पत्नी जागीच ठार

**पैठण/चैताली औटे**
भरधाव कारने दुभाजक ओलांडून स्कूटीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दाम्पत्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील माळीवाडा टोलनाक्याजवळ घडली. छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा न्यायालयात वकिली करणारे ॲड. सतीश शाहूजी मगरे (वय ३२) व त्यांच्या पत्नी तेजल सतीश मगरे (वय ३०) रा. महाकाळा, ता. अंबड, जि. जालना हे दोघे स्कूटीने (२१ बी एन ९९२३) रविवारी अंबड येथे साखरपुड्याच्या कार्यक्रमाला गेले होते. कार्यक्रम संपल्यानंतर ते छत्रपती संभाजीनगरकडे सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास येत होते. यावेळी छत्रपती संभाजीनगरकडून बीडकडे जाणाऱ्या भरधाव कार (एमएच ४४ एस ९५६०)चालकाचे नियंत्रण सुटल्याने महामार्गावरील दुभाजक ओलांडून दुसऱ्या बाजूच्या स्कूटीस धडक दिली. स्कूटीवरील दाम्पत्य महामार्गाच्या नालीत कारसह जाऊन पडले. कारखाली दबून ॲड. सतीश मगरे व तेजल मगरे या दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडताच कारचालक घटनास्थळावरून फरार झाला. टोलनाका रुग्णवाहिकेने दोघांना पाचोड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी पवार यांनी तपासून दोघांना मयत घोषित केले.

# बीड शहर भयमुक्त करण्यासाठी मनसेने केले जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन...

**बीड/प्रतिनिधी**
बीड शहरात गेली काही दिवसापासून चोरांचा सुळसुळाट पाहायला मिळाला यामध्ये तीन घरी मोठ्या प्रमाणात चोरी देखील झाली घरातील साहित्याची तोडफोड करत चोरट्यांनी ऐवजी लांब पास केला याची पोलीस प्रशासनाने दखल घ्यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. या मनसे चे करण लोंढे व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. एवढेच नव्हे तर बीड



शहरातील अंकुश नगर भागातील नागरिकांनी एकत्र येत या भागात असलेली करपरा नदी स्वच्छ केली यामुळे देखील या भागातील नागरिकांना बऱ्याच प्रमाणात दिलासा मिळाला मात्र चोरांचा सुळसुळाट अजूनही चालूच असल्याने नागरिक मात्र भयभीत आहेत पोलीस प्रशासन चोरट्यांना पकडण्यात अपयशी ठरत आहे मात्र काही चोर पकडले आहेत मात्र यामागे नक्की कोण आहे याचा तपास अजून लागलेला नाही त्यामुळे बीड शहरात अजूनही दहशतीचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# केज विधानसभा रिपाई लढवणार जिल्हा बैठकीत निर्णय - शैलेंद्र पोटभरे

## रिपाई मध्ये बहुसंख्येने कार्यकर्त्यांचा प्रवेश

**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अंबाजोगाई शासकीय विश्रामगृह येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या अध्यक्षस्थानी बैठक संपन्न झाली.या बैठकीस स्थानिक स्वराज्य निवडणुका व केज राखीव विधानसभा मतदारसंघ रिपाई एकतावादी निवडणूक लढणार आहे असा निर्णय या बैठकी दरम्यान घेण्यात आला रिपाई एकतावादी जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी रिपाई मध्ये अंबाजोगाई व परिसरातील बहुसंख्ये कार्यकर्त्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला बैठकीस रिपाई एकतावादीचे महाराष्ट्र सचिव पंडित झिंजुर्डे, बीड जिल्हा अध्यक्षा महिला आघाडी सीताताई भोसले, जिल्हा उपाध्यक्ष डी.एस. तूपसमुद्रे, महिला जिल्हा कार्याध्यक्षा आशाताई धुताडमल, बीड तालुका महिला सचिव आशाताई कोकाटे, गेवराई तालुका



अध्यक्ष हनुमंत काळे, परळी ता.अध्यक्ष संजय भद्रे धारूर ता कार्याध्यक्ष आबासाहेब जावळे धारूर ता.उपाध्यक्ष इंद्रजीत डोंगरे ता.कार्याध्यक्ष युवा धारूर संतोष जावळे, केज तालुका अध्यक्ष आनंद वाव्हळ, परळीचा उपाध्यक्ष सुनील कांबळे, आंबेजोगाई ता. अध्यक्ष आदित्य जोगदंड एकनाथ उजगरे,नितीन पोटभरे,साहेबा शिंदे, बीड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

# बीड न.प.अभियंता आखिल फारुखी वर कारवाई करा-नितीन मुजमुले

**बीड/प्रतिनिधी**
बीड नगरपरिषद बांधकाम विभाग उपअभियंता आखिल फारुकी हे महिलांशी उधट पणाची वर्तणूक करत असल्याने तसेच पात्र लाभार्थ्यांनी घरकूल वाटपात टक्केवारी शिवाय मंजूरी देत नसल्याने आणि पात्र नसलेल्या संबंधित बड्या लोकांना खिरापत वाटल्याप्रमाणे चेकची वाटप करत असल्यामुळें अशा मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्याला तत्काळ कार्यमुक्त करून निलंबीत करण्यात यावे. नगरपरिषद बीड चे बांधकाम विभागाचे उपअभियंता आखिल फारुकी हे रमाई आवास योजना आणि प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर गोरगरिबांना हक्काचे घर व्हावे यासाठी शासनाने घरकूल योजना आणल्या मात्र याच घरकूल योजनेचे लाभार्थ्यांना चेक देत असताना पहिला चेक, दुसरा चेक आणि तिसरा चेक प्रमाणे टक्केवारी घेतली जाते. तसेच ते गोरगरीब घटकातील महिलांशी उधट वर्तणूक करतात हे फार गंभीर आहे. शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच गरीब व दारिद्ररेषे खालील घटकांना स्वतःचे हक्काचे घर व्हावे यासाठी शासन आवास योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना स्वतःच्या व हक्काच्या घरासाठी आर्थिक मदत देत आहे. मात्र पात्र लाभार्थ्यांनी घरकूल वाटपात टक्केवारी शिवाय चेक देत नसल्याने आणि पत्रा नसलेल्या संबंधित बड्या लोकांना खिरापत वाटल्याप्रमाणे चेकची वाटप करत आहेत. बीड नगरपरिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता आखिल फारुकी हे घरकूल योजनेचा चेक देत असताना लभार्थ्यांना टक्केवारी च्या माध्यमातुन लुटले जात आहे. त्यामुळे अश्या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही म्हणून. जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी , नगरपरिषदेतील मनमानी अधिकारी बांधकाम उपअभियंता आखिल फारुकी यांच्या कडून सर्रास लूट व गैर कारभार करत असल्याने तत्काळ चौकशी करून कार्यमुक्त करून निलंबित करावे अशी मागणी नितीन मुजमुले यांनी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



## महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेला 31 ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

बीड, दि.8 (जिमाका) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना 2023 च्या दुसरा टप्पाला 31 ऑगस्ट 2024 पर्यंत ची मुदत वाढ देण्यात आली असल्याचे सहाय्यक जिल्हा निबंध तथा मुद्रांक शुल्क अधिकारी बीड यांनी कळविले आहे. योजना महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ ही योजना दोन टप्पात राबविण्यात आली आहे. पहिला टप्पा ०१ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत होता. आणि योजनेचा दुसरा टप्पा दिनांक ०१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ या कालावधी असून ही योजना राबविण्यात आली होती. योजनेच्या दुसऱ्या टण्यासाठी दिनांक ३०/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता योजनेच्या दुसरा टप्पाला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यासह महसूल आणि वन विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब (असाधारण क्रमांक 243) च्या आदेशातील जोडपत्र (Annexure) खंड (फ) च्या नंतर clause “g” नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे याअंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जमिनीवर वसलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने निवासी किंवा अनिवासी घटकांबाबतचे पहिले वाटप पत्र किंवा शेअर सर्टिफिकेट किंवा स्टॅम्प नसलेल्या कागदावर किंवा लेटर हेडवर जारी केलेले किंवा अंमलात आणलेले करार महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) आणि विभागीय मंडळे किंवा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) किंवा महानगरपालिका, नगर पंचायत किंवा विकास किंवा नियोजन प्राधिकरणांनी मंजूर केलेले किंवा गठित राज्य सरकारच्या विहित नियमांनुसार राहणार असल्याचे ही कळविण्यात आलेले आहे. सोबत जोडपत्र जोडलेले आहे.

# बेकायदेशीर प्रेस स्टिकर व इतर लोगो लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची पत्रकार संघाची मागणी.

## योग्य ती कारवाई करण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांचे आश्वासन

आपण यावर कायद्याच्या चाकोरीत राहून सबंधितांवर योग्य ती कार्यवाही करू

राजेंद्र कोते पाटील
वरिष्ठ पोलीस निरीक्षक

कारवाई करत असताना सर्व वाहानांची तपासणी करण्यात यावी. यामध्ये जे बोगस सापडतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

घन:श्याम कडू अध्यक्ष,
उरण तालुका मराठी पत्रकार संघ

**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यात बेकायदेशीर प्रेस स्टिकर व इतर शासकीय लोगोचा वापर करणे बेकायदेशीर असतानाही उरण तालुक्यात अनेक छोट्या मोठ्या वाहनांवर वापर केला जात आहे. अशा लोगोचा वापर करून अनेक गैरधंदे केले जात असल्याचे निदर्शनास येत असल्याने त्यावर कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्याकडे केली. यावेळी योग्य ती कारवाई करण्याचे संकेत त्यांनी यावेळी पत्रकार संघाला दिले.

उरण तालुक्यात अनेक वाहानावर बोगस पत्रकार प्रेस स्टिकर लावून गैरधंदे करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे पत्रकारांचे नाव मलिन होत आहे. तसेच इतर वाहानांवर महाराष्ट्र शासन, व्हीआयपी, पोलीस इतर नावांच्या लोगो असलेल्या गाड्या फिरतांना दिसत आहे.

भविष्यात यामुळे घातपात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी आपल्या शासकीय पातळीवर अशा बोगस पाटीचा वापर करणाऱ्यांवर ठोस कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघातर्फे करण्यात येत आहे. याविषयी बोलताना उरण पोलिस अधीक्षक यांनी सांगितले की अशा गाड्या लोगो लावून फिरत असतात परंतु ते पत्रकार असल्याचे सांगतात त्यामुळे मग नाईलाजाने त्या गाडीवर कार्यवाही न करता सोडून द्यावे लागते. आपण केलेल्या मागणीचा नक्कीच विचार करून बेकायदेशीर लोगो लावणाऱ्या संबंधित गाड्यांवर व सदर व्यक्तीवर कारवाई करण्याचे संकेत दिले.

उरणचा औद्योगिक विकास झपाट्याने होत चालला आहे. त्यामुळे अशांपासून भविष्यात धोका संभवत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. उरण परिसरात



अनेक चार चाकी आणि दुचाकी गाड्यांवर अशा प्रकारच्या आशयाचे लोगो असलेले स्टिकर लावले जात आहेत. त्यामुळे अनेकदा तपास यंत्रणांना ही चौकशी करतांना काही कारणास्तव आपले हात आखडते घ्यावे लागत आहे. प्रेस स्टिकर्स, शासकीय लोगो उदाहरणार्थ महाराष्ट्र शासन, पोलिस, ज्यांचा या सेवेशी काडी मात्र संबंध नसतो तसेच तो गाडी फिरवणारा ही अज्ञान असताना समोर असलेल्या स्टिकर मुळे तपास यंत्रणांतील अधिकारी वर्ग कारवाई करीत नसल्याचा फायदा उठवीत असतात. अशा बहाद्दरांवर वेळीच उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

एखाद्याच्या गाडीवर शासकीय लोगो असल्यास त्या गाडीला तपासणे म्हणजे नोकरीवर गदा असते त्यामुळे मग अनेकदा अशा गाड्या न तपासता सोडल्या जात असतात. याचाच फायदा घेऊन भविष्यात एखाद्या घातपाताची घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पत्रकारांचे अथवा इतर शासकीय लोगोचे नाव खराब होऊ नये याद्दष्टीने उरण तालुका मराठी पत्रकार संघाने हे पाऊल उचलत अशा अनधिकृत गाड्यांवर कारवाई व्हावी म्हणून संघाच्या वतीने मागणी करीत तशा प्रकारचे पत्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना दिले.

# गेवराई तालुक्यात बोगस कारवयामुळे महसुल विभागाची प्रतिमा मलीन होतेय का ?

## सामान्ये जनतेमधुन चर्चाला उधाण-विश्वनाथ शरणांगत

**बीड /प्रतिनिधी**

बीड जिल्हा मध्ये गेवराई सह जिल्ह्याच्या ठिकाणी सामान्ये जनतेची मोठया प्रमाणात ओरड आसुन सामान्ये जनतेचे कुठलेच कामे सुरळत होताना दिसत नाहीत. बीड जिल्हयातील स्थानिक कार्यलयाचे महसुल विभागाचे कोणतेच कर्मचारी सामान्ये जनतेचे कामे करण्यास टाळा टाळ करीतांना दिसत आहेत. सध्या बीड जिल्हा त वाळु माफिया मुळे महसुल चे कर्मचारी हे सामान्ये जनतेचे कामे करत नाहीत या वाळु माफियामुळे कर्मचारी हे हाफ्ते घेत मौज मजा करत स्थानीक नागरिकांना वेठीस धरत त्या



नागरीकांचे कोणतेही कामे आसले तर ते काम करून घेण्याकरिता पैशे दिल्याशिवाय कामे होत नाहीत.जे स्थानिक कार्यालय दिलेले आसते तेथे कधीच हा जर राहात नाहीत सर्व तालुका स्तरावरूनच कामे करत आहेत.दुसरी बाब आसे की या भ्रष्ठ कारभाराने व वाळुचे हा हाते खान्याची सवय लागल्यानी सामान्ये जनतेची कोणतीच कामे होत नाहीत . सर्व महसुल विभागाचे कर्मचारी हे वाळु माफिया च्या संबंधात राहून सामान्ये नागरीकांस भेडवण्याचे काम पण हे कर्मचारी लोक करत आसतात.या भ्रष्ठ कारभाराने व वाळु माफीयांकडून हाफ्ते खात आसल्याने महसुल विभागाची बदनामी होतांनी दिसत आसल्याची चर्चा सर्वसामान्ये नागरीकाकडून ऐकावयास मिळत आहे. सर्व पैशाच्या जिवावर खोटे कामे करणे ज्या आधिकाऱ्याच्या आधिकरात आसलेले कामे व्यवस्थीत न करणे वरिष्ठ आधिकारी या ना खोटा रिपोर्ट देऊन इकडे पैशे खाणे हे आसे अंध धुंद चालु आसल्याने वरिष्ठ महसुलचे आधिकारी यांनी दखल घेणे गरचे चे आहे परंतू तसे होताना दिसत नाही.त्यामुळे सर्व सामन्ये जनतेमध्ये रोष आहे. आज महसुल विभाग म्हणजे सर्व सामान्ये जनतेचे जिवंत दैवत मानल्या जातेय परंतु त्याच महसुल विभागाची प्रतिमा मलीन होतांनी दिसत आहे आसे सर्व सामान्ये जनतेचे मत आहे.त्यामुळे महसुल विभागाच्या प्रत्येक वरिष्ठ आधिकारी यांनी याकडे लक्ष देवुन योग्य कार्यवाही करणे, योग्य आसल्याचे मत जनतेमधून ऐकावयास मिळत आहे .

# केंद्रप्रमुख,सुखदेवराव तोंडे शिक्षण क्षेत्रातुन सेवानिवृत्त

येवता/प्रतिनिधी

आप्पाराव सारूक दि.०६ रोजी गट साधन केंद्र,केज कार्यालयातील सुखदेव तुकाराम तोंडे वयानुरूपी सेवानिृवत्ती झाले त्यांच्या मनोगतात ते म्हणाले न की दोन गोष्टी विचारल्या जातात.एक म्हणजे तब्येत आणि दुसरं म्हणजे तुमची मुलं काय करतात. मी ह्या दोन्ही गोष्टी साध्य केल्या आहेत माझा मुलगा दंतरोगतज्ञ डॉ.भगवान सारखा कुटुंब वात्सल्य, संवेदनशील, कर्तुत्वान, स्वाभिमानी, सत्यवादी,सामाजिक भान आणि बांधिलकी ठासून भरलेला मुलगा घडवला तसेच आपली मुलं कशी सांभाळावी हेच नाहीतर कशी घडवली पाहिजे हे शिकवलं .पेशा शिक्षक होता अनेक विद्यार्थी घडवले पण कुटुंब एका रेषेत बांधून ठेवले.दोन मुलीचं शिक्षण करून अतिशय चांगल्या घरात एक पोलीस तर दुसरे डॉक्टर यांच्याशी विवाह करूण त्यांचे संसार आनंदात आहेत सुखदेव तुकाराम तोंडे सर केंद्रप्रमुख हे आज दि.३०/जून/२०२४ रोजी त्यांच्या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. तब्बल ३९ वर्ष त्यांनी शासकीय सेवा दिली. १९८५ साली त्यांच्या मूळ गावी सोनीमोहा ता.(किल्ले)धारूर येथे ते शिक्षक म्हणुन रुजू झाले,याठिकाणी त्यांनी बरीच वर्ष सेवा केली त्यांचे सर्व कुटूंब त्यानंतर किल्ले धारुर व काठेवाडी येथे मुख्याध्यापक म्हणुन पद संभाळे , पदोन्नती झाल्यानंतर त्यांची सिरसाळा ता.परळी येथे केंद्रप्रमुख म्हणुन नियुक्ती झाली, आणि सध्या ते आडस ता. केज येथे केंद्रप्रमुख म्हणुन काम करत त्यांनी अतिरिक्त केंद्राचा पध्दभार लव्हूरी व टाकळी असे तिन तिन केंद्राची ज्वाबदारी प्रमाणीक पणे पार पाडली.




कुठलाही गैरमार्ग न वापरता त्यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी हे त्यांच्या जीवनात यशस्वी झाले. शेतीची आवड, नातेसंबंध जोपासणे हे त्यांचे छंद आहेत. अत्यंत शांत स्वभाव, मितभाषी व धाडसी असलेल व्यक्तिमत्त्व म्हणजे सुखदेवराव तोंडे त्यांच्या चांगल्या कार्यामुळे त्यांना जिल्हा परिषद बीड ने १९९८ साली आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या पत्नीने ही त्यांना खुप मोलाची साथ दिली.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती माजी.आ. केशवराव आंधळे,गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनीलराव केंद्रे,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रेय चाटे,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गणेश गिरी, माजी उप शिक्षणाधिकारी हिरालाल कराड,आडस केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक आनंद शेळके,केंद्रप्रमुख सुखदेवराव तोंडे,यांच्या पत्नी सौ.किसनाबाई तोंडे,डोनगावचे मा.सरपंच बाबुराव घुले,सुभाष चौरे,शिक्षिका शिक्षक वृंद इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वानी सुखदेवराव तोंडे यांना दीर्घ व निरोगी आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना सर्वानी करूण त्यांचे पुढील आयुष्य जनसेवा करण्याचे भाग्य लाभो अशी अपेक्षा व्यक्त केली.

# ७.९ कोटी रुपयांचे आठ मेट्रिक टन रक्तचंदन पकडले

**पुणे/पंकज भंडारी**

पुणे-भारताबाहेर परदेशात ग्रॅनाइट संगमरवरी स्लॅबच्या नावाखाली दुर्मिळ प्रजाती असलेले रेड सँर्डस (रक्तचंदन) लाकूड तस्करी केल्या जाणाऱ्या प्रकारावर सीमाशुल्क (डीआरआय) च्या पुणे प्रादेशिक विभागाने गोपनीय देखरेख ठेवली. त्यावेळी संबंधित माल निर्यातीसाठी देशाबाहेर पाठविण्याकरिता न्हावा शेवा बंदरात (जेएनपीटी) बंदरात कंटनेर मध्ये भरुन पाठविण्यास सज्ज असताना, डीआरआयने छापा टाकून कारवाई केली. त्यावेळी कंटनेर मध्ये सहा टन रेड सँर्डस पॉलिश केलेल्या ग्रॅनाईट स्लॅब आणि सिमेंटच्या विटांच्या मागे लपवल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर डीआरआय पथकाने अधिक तपास करत, विविध ठिकाणी छापेमारी करत एकूण ७.९ कोटी रुपयांचे आठ मेट्रिक टन रेड सँर्डस लाकूड जप्त केल्याची माहिती दिली आहे. रेड सँर्डस हे संरक्षित प्रजाती असून



सीमाशुल्क कायदा, १९६२ अंर्तगत तिची निर्यात प्रतिबंधित करण्यात आली आहे. जेएनपीटी मध्ये तब्बल सहा टन रेड सँर्डस मिळून आल्यावर सदर माहीतीच्या आधारे अहमदनगर, नाशिक आणि हैद्राबाद येथे तपास सुरु करण्यात आला. त्यानुसार नाशिक येथील एका गोदामाची झडती घून त्यात दोन मेट्रिक टन रेड सँर्डस जप्त करण्यात आले. ते लवकरच परदेशात निर्यात केले जाणार होते. न्हावाशेवा बंदरात जप्त करण्यात आलेले सहा मेट्रिक टन रेड सँर्डस हे देखील याच गोदमात साठवून निर्यातीसाठी बाहेर काढण्यात आले होते. त्यानुसार एकूण आठ मेट्रिक टन रेड सँर्डस लाकूड सीमाशुल्क कायद्याच्या संबंधित तरतुदीनुसार जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी निर्यातदार, दलाल, गोदाम व्यवस्थापक आणि वाहतूकदारासह पाचजणांना अटक करण्यात आली असून त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

## भारतीय क्रिकेटपटू झहीर खानने पिकलबॉलवरील अहवालाचे केले अनावरण



**मुंबई/प्रतिनिधी**


कृशांग स्पोर्ट्सने "पिकलबॉल: द डेव्हलपमेंट रोडमॅप फॉर इंडिया" या शीर्षकाचा आपला ताजा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल आयआयएसएम (आंतरराष्ट्रीय क्रीडा आणि व्यवस्थापन संस्था) आणि एआयपीए (ऑल इंडिया पिकलबॉल असोसिएशन) यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. हा अहवाल खेळाबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतो आणि खेळाचा विकास करण्यासाठी फ्रेमवर्क विस्तृत करतो. भारतीय क्रिकेटचे दिग्गज माजी वेगवान गोलंदाज झहीर खान, आयआयएसएमचे संस्थापक संचालक नीलेश कुलकर्णी आणि आमदार ॲड पराग अळवणी यांच्या हस्ते या अहवालाचे लोकार्पण करण्यात आले. इतर मान्यवरांसोबत प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे विश्वस्त श्री राजू रावल, मकरंद येडुरकर तसेच प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे व आंतरराष्ट्रीय पिकलबॉल असोसिएशन अध्यक्ष मा.श्री. अरविंद प्रभू हे ही उपस्थित होते. पिकलबॉल हे टेनिस, टेबल टेनिस आणि बॅडमिंटनचे संयोजन आहे. हा एक मनोरंजक खेळ आहे जो भारतात लोकप्रिय होत आहे "हा क्रिशांग स्पोर्ट्सचा एक अनोखा उपक्रम आहे, ज्यात पिकलबॉल वेगाने वाढत असून त्यावर प्रकाश टाकणे आवश्यक होते आणि अहवालात अधोरेखित केलेल्या विकास आराखड्यामुळे राज्य आणि जिल्हा घटकांना त्याचा फायदा होईल ". कृष्णांग स्पोर्ट्सचे संस्थापक मेहूल रावल यांनी ही माहिती दिली विदर्भ पिकलबॉल असोसिएशनचे अध्यक्ष श्रेयांश मोहता यांनी सांगितले की, "हा महत्त्वाचा अहवाल आहे, त्याचा आम्हाला फायदा होईल". ज्ञानाचा अहवाल पार्श्वभूमी, कल अधोरेखित करतो आणि खेळाच्या भविष्यातील संभाव्यतेचे परीक्षण करतो. ही एक महत्त्वाची घटना होती कारण भारतात पिकलबॉल खेळाचा अहवाल प्रथमच प्रसिद्ध करण्यात आला होता. भारतीय क्रिकेटपटू झहीर खान "पिकलबॉलवरील अहवाल सादर करण्याच्या विक्रमासह सुरुवात करताना मला खूप सन्मान वाटतो"हा कार्यक्रम नुकताच प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल येथे पार पडला

## नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्र्यांची पुणे मेट्रो कार्यालयाला भेट

### पुणे मेट्रोची सद्यस्थिती आणि विकास प्रकल्पांचा घेतला सर्वंकष आढावा

**पुणे /पंकज भंडारी**

पुणेः पुण्याचे नवनिर्वाचित खासदार आणि नागरी उड्डाण आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुणे मेट्रो प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी पुणे मेट्रो कार्यालयाला भेट दिली. या बैठकीसाठी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह हे उपस्थित होते. या आढावा बैठकीत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी मान्यवरांना प्रकल्पाचा आढावा सादर केला. यावेळी महामेट्रोचे अतुल गाडगीळ (संचालक, कार्य), विनोद अग्रवाल (संचालक, संचालन आणि प्रणाली), डॉ. हेमंत सोनवणे (कार्यकारी संचालक, प्रशासन व जनसंपर्क)





आणि महा मेट्रो पुणेचे इतर अधिकारी उपस्थित होते. अधिक वारंवारितेसह फीडर सेवेची तरतूद, स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्ग, वनाझ ते चांदणी चौक मेट्रो मार्ग आणि रामवाडी ते वाघोली मार्गिकेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर), पुणे विमानतळावर फीडर सेवांसाठी प्रवेश आणि इतरत्र फीडर सेवांची तरतूद यासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. याव्यतिरिक्त भविष्यात पुणे व पिंपरी चिंचवड शहरात नवीन मेट्रो मार्गांची आवश्यकता भासणार आहे. त्यावर देखील चर्चा झाली. पुणे मेट्रो सध्याच्या फीडर बस सेवेमधून दररोज ५००० प्रवासी प्रवास करत आहेत. अधिकच्या फीडर बससेवेमुळे ही संख्या वाढण्याची अपेक्षा आहे. या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, "पुणे शहरात वाहतूक समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. शहरात मेट्रोचे अधिकाधिक मार्ग बांधण्याची गरज आहे. तसेच मेट्रो फिडर सेवा देखील बळकट करण्याची आवश्यकता आहे. पुणे मेट्रोच्या नवीन मार्गाच्या प्रकल्प अहवालांचा पाठपुरावा करण्यात येऊन लवकरात लवकर त्यांना मान्यता देण्यात मी कायम प्रयत्नशील राहील." महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर म्हणाले, "पुणे मेट्रो प्रकल्प चांगल्या प्रकारे प्रगतीपथावर आहे, आणि आम्ही कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी आणि पुण्यातील नागरिकांसाठी प्रवासाचा एकूण अनुभव सुधारण्यासाठी कटिबद्ध आहोत. पुणे मेट्रोला सर्वांसाठी पसंतीचे परिवहन साधन बनवणे हे आमचे ध्येय आहे. पुणे मेट्रो आपल्या प्रवाश्याना पर्यावरण पूरक, स्वस्त, कार्यक्षम आणि आरामदायी प्रवास देत आहे."

## भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी आनंदगाव ग्रामस्थांची ५१ लाख रुपये देणगी २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**भगवानगड/प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे आनंदगाव (ता. शिरूर, जि. बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५१ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र



भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील

माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री - ङ्गमाझी लाडकी बहीणङ्ग या योजनेचा लाभ सर्व पात्र माता भगिनींनी लाभ घ्यावा-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या "मुख्यमंत्री -लाडकी बहीण" योजनेचा फायदा राज्यातील सर्व पात्र माता भगिनींनी घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे. या योजने अंतर्गत राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांनी जाहीर केले असल्याचे मोदी यांनी सांगत त्याचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात जाहिर केलेल्या 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण' ही योजना नुकतीच जाहीर केली. अतिशय अल्पावधीतच या योजनेची लोकप्रियता वाढल्याने सदर योजनेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता या योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा करत काही अटी शिथील करून अर्ज सादर करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर व परिसरातील पात्र माता भगिनींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी याकामी पुढाकार घेवून गरजू व पात्र महिलांना याकामी मदत करावी असे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

## वीज कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ-देवेंद्र फडणवीस मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ

**मुंबई/प्रतिनिधी**

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याची माहिती, उमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आज सह्याद्री अतिथी गृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,





महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार या तिन्ही कंपन्याचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, तसेच संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, तिन्ही वीज कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात मध्ये १९ टक्के व सर्व भत्त्या मध्ये २५ टक्के वाढ देण्याचे मान्य केले आहे. तसेच सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधी करीता पाच हजार रुपयांची वाढ आणि तांत्रिक कर्मचारी यांना मिळणारा रू.५००/- चा भत्ता रु.१०००/- इतका करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

# केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांच्या प्रयत्नातून बीड ते श्री क्षेत्र नारायण गड बस सेवा

## विद्यार्थी विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

**बीड प्रतिनिधी**

श्री क्षेत्र नारायण गड येथील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लाल परी ची आज पासून सुरुवात बीड , खापरपांगरी ,उंबरद ,तांदळवाडी ,केतुरा, रुद्रापुर फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायण गड अशी विद्यार्थ्यांसाठी नवीन बस सेवा चालू करण्यात आली, बीड तालुक्यातील केतुरा या गावचे लोकप्रिय सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी अनेकदा पाठपुरावा करून, एसटी बस सेवा सुरू करण्याबाबत, अनेक वेळा विभागीय कार्यालयामध्ये निवेदन दिले आहेत, आज विभागीय कार्यालयातील कर्मचारी यांनी बीड केतुरा साक्षाळपिंपरी मार्गे श्री क्षेत्र नगद नारायण गड ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे, यावेळी एसटी कर्मचारी वाहक कंडक्टर यांचा सत्कार, केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी केला आहे,बीड बस डेपोचे गवते सर, होके सर , होले सर ,नागरगोजे सर, आणि बनसोडे सर



यांचे विशेष सहकार्य झाले यावेळी शाळेतील महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, नगद नारायण विद्यालयाची शिक्षक वृंद पवळ सर ,लोंढे सर, भोसले सर, वखरे सर, शेळके सर, गायकवाड सर, गोरख घोंगडे शिपाई व मौजे केतुरा येथील ग्रामस्थ दिलीप रहाडे ,राजेंद्र घार्गे, महादेव तळेकर, गजेंद्र बेद्रे, गणेश भुसारी ,भीवसेन निळकंठ ,नंदकुमार घार्गे, दादासाहेब निळकंठ, बंडू तळेकर, अशोक शिंदे, श्रीराम शिंदे, गोविंद तळेकर, मिठू नागरगोजे, व इतर ग्रामस्थ यांनी बस सेवा आगाराची आभार मानले.

# गुरु आनंद महिला प्रतिष्ठान मार्फत नागापूर खुर्द शाळेत मोफत वह्या वाटप

बीड : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द येथे गुरु आनंद महिला प्रतिष्ठान मार्फत पहिली ते सातवी च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष रमेश भाऊ पोकळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रज्ञाताई खोसरे श्वेताताई घाडगे अंजलीताई भोसले खांडे पारगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक जलील शेख गुरु आनंद प्रतिष्ठानच्या सर्वेसर्वा सीमा ओस्तावाल नागपूर बुद्रुकचे मुख्याध्यापक युवराज साळुंखे नागपूर खुर्द चे मुख्याध्यापक नवीन शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी यांनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या सर्वेसर्वा सीमा ओस्तवाल यांनी केले. त्यानंतर खांडे पारगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक जलील शेख व नागापूर खुर्द च्या पदवीधर शिक्षिका सुमन जोगदंड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तदनंतर मान्यवरांच्या हस्ते शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप




रमेश भाऊ पोकळे यांनी केला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित मुळूक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिमा छत्रबंद अयोध्या आंधळे अलका गेठे प्रज्ञा उजगरे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करण्यात आला.



गावंदरा जिल्हा परीषद प्राथ. शाळेतील श्रीम. जया विनायक घुगे - मुंडे व श्रीम. अनुराधा मोतेवार यांना षटकोली साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून यथोचित सन्मान




# बीड शहर चोरांपासून भयमुक्त करण्यासाठी मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

बीड (प्रतिनिधी) बीड शहरात सर्वत्र सध्या चोरांचा सुळ-सुळाट सुरु असून वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांची झोप उडाली आहे त्यामुळे चोरांवर लगाम लावून त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी मनसे जिल्हा सचिव सोमेश कदम व मनसे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी बीडकरांना भयमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज आंदोलन केले असून वाढत्या चोऱ्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड आणि पोलीस अधिक्षक, बीड यांना दिले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड शहरामध्ये मागच्या दहा दिवसापासून चोरांनी धमाकूळ घातलेला आहे आणि चोरांची भीती प्रचंड बीड शहराच्या नागरिकांमध्ये बसलेली आहे आणि या भीतीमुळे शहराचे वातावरण भीतीमय झालेले आहे आणि अशातच पोलिसांनी देखील कबुली दिली आहे की चोर खूपच खुकार असल्याचे पोलिसांनी देखील हे चोर मोठा दरोडा, रोड रॉबरी त्याचबरोबर खून देखील करण्याच्या



तयारीत असल्याचं पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितल्यामुळे बीड शहरात भीतीच मोठं वातावरण निर्माण झालेला आहे आणि ही परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर गेली की काय? असा प्रश्न बीड शहरातील नागरिकांमध्ये पडलेला आहे. वाढत्या चोऱ्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे आणि बीडकरांना भयमुक्त करावे लवकरात लवकर परिस्थिती नियंत्रणात नाही आली आणि चोरांना अटक नाही झाली तर आणखीन तीव्र आंदोलन करु असे पत्रकाद्वारे जिल्हा सचिव सोमेश कदम , शहराध्यक्ष करण लोंढे, कुणाल उगले उपजिल्हाध्यक्ष, ऋषिकेश गिराम विद्यार्थीसेना जिल्हाध्यक्ष यांनी पत्रकाद्वारे केले आहे

## खोलेश्वर मंदिराच्या संवर्धनासाठीच्या ८ कोटी ३० लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ.

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

शहरातील श्री खोलेश्वर मंदिराच्या संवर्धन कामाचा शुभारंभ आ. नमितताई मुंदडा यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला. शहराच्या धार्मिक,पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या श्री खोलेश्वर मंदिराच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभाग यांच्याकडून ८ कोटी ३० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात यश आले. दि.८ जुलै सोमवार रोजी खोलेश्वर मंदिर संवर्धन कामाचा शुभारंभ आमदार नमितताई अक्षय मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला. या संवर्धन कामामुळे मंदिराला त्याचे गतवैभव प्राप्त होणार आहे. या प्रसंगी खोलेश्वर मंदिराचे विश्वस्त अ‍ॅड.शरद अण्णा लोमटे, अरुण काळे, रवींद्र जाधव, अविनाश धायगुडे, आर्किटेक्ट आकाश कराड, कल्याण काळे, धनराज सोळंकी, डॉ.निशिकांत पाचेगावकर, प्रशांत आदनाक, सुनील अडसूळ, प्रकाश बोरगावकर, शेरेकर, शिरिष मुकडे, सुनील मस्के, अमोल विडेकर,अनंत अरसुडे, तुकाराम सातपुते, अभिनव उपाध्ये, नरसिंग नंदगवळी, बिभीषण भालेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



# ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागत समितीचे पदाधिकारी जाहीर

अंबाजोगाई/परवेज पटेल

मसाप शाखा अंबाजोगाई च्या वतीने घेण्यात येणा-या नियोजित ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केली.

डिसेंबर महिन्यांमध्ये घेण्यात येणा-या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या पुर्वतयारी साठी येथील पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली.

स्वागत समितीचे अध्यक्ष सुदर्शन रापतवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत त्यांनी पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. सदरील समिती खालील प्रमाणे आहे. सचिव पदी प्रा.पंडीत कराड, सह सचीव विष्णू सरवदे, उपाध्यक्ष सुभाष बाहेती आणि वंदना तेलंग-कोपले,कोषाध्यक्ष गोरख शेंद्रे, व्यासपीठ नियोजनप्रमुख विजय रापतवार, सांस्कृतिक कार्य प्रमुख सुनील व्यवहारे, प्रसिद्ध प्रमुख अश्रब पठाण कार्यकारिणीचे सदस्य म्हणून दत्ता अंबेकर, चंद्रकला देशमुख, जयश्री डोंगरे-कराड, ॲड. जयंत भारजकर, प्रा. नागेश जोंधळे, डॉ.देवराव चामनर, विशाल जगताप यांचा समावेश आहे. अंबाजोगाई साहित्य संमेलन हे दर दोन वर्षांनी होणारे गावचे संमेलन आहे. जेंव्हा कुठेच गावची साहित्य संमेलने होत नव्हती तेंव्हा सुरू झालेले. हे गावचे संमेलन आहे.

या शिवाय हे संमेलन रसिकाश्रयी आहे. म्हणजे, कोण्या धनको कडून किंवा सरकार कडून देणगी घेऊन साजरे केले जाणारे हे संमेलन नाही. स्वागत सभासदांकडून जेवढी रक्कम जमा होते, तेवढ्याच रक्कमेत साहित्य संमेलन घेतले जाते. हे संमेलन स्वाभिमानी आहे. साहित्यिकांचा सन्मान वाढवणारे आहे. या संमेलनाची स्वागत सदस्यता फी फक्त २०० (दोनशे) रुपये आहे. दोनशे रुपये भरून जे सभासद होतील ते रसिक हे या संमेलनाचे मानकरी आहेत. तेच आधारस्तंभ आहेत. अंबाजोगाईच्या जास्तीत जास्त नागरिकांनी या संमेलनाचे स्वागत सभासद व्हावे असे समिती मार्फत करण्यात आले. आपल्या गावचे हे अनोखे साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077